जा.क्र.मरापप/आयुक्त/स्विस/१७

कालमर्यादित :

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१
दिनांक : ०९/०८/२०१५

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय:- जी.सी.सी. परीक्षा जून - २०१५**
उत्तरपत्रिका छायाप्रती मिळणेबाबत व गुणपडताळणी करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, जी.सी.सी. परीक्षा जून -२०१५ चा निकाल दिनांक ०९/०८/२०१५ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेला आहे. जी.सी.सी. परीक्षेबाबत प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी करणेकरिता व उत्तरपत्रिका छायापती प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक २५/०८/२०१५ पर्यंत सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्ज विहित शुल्कासह (गुणपडताळणीसाठी प्रती विषय रू.१००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रती विषय रू.४००/- चलनाने भरावे.) अर्ज विहित मुद्दतीत सादर करावेत. दिनांक २५/०८/२०१५ नंतर प्राप्त होणा-या अर्जाचा व दिलेल्या दरानुसार शुल्क न भरलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदरची सुचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, याची नोंद घेण्यात यावी.

**सोबत :** गुणपडताळणी/ उत्तरपत्रिका छायाप्रत नमुना अर्ज/अटी/शर्ती व सूचना.

(रा.वि.गोधने) ९/८/१५
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ४११ ००१**

**प्रतः माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

**१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व**
**२. शिक्षणाधिकारी (माध्य.) सर्व**

# गुणांची पडताळणी/ उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्यासाठी अर्जाचा नमुना

प्रती,
**मा. आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे १

गुणपडताळणीसाठी अर्ज सादर करणारा विद्यार्थी अनुत्तीर्ण असेल तर त्याने गुणपडताळणीच्या निर्णयाची वाट न पाहता आगामी परीक्षेसाठी सादर करावयाचे आवेदनपत्र विहित मुदतीतच सादर केले पाहिजे.

विषय :- गुणांची पडताळणी / उत्तरपत्रिका छायाप्रत मिळणेबाबत.........

महोदय,

मी ..................................................................................................

महिन्यात झालेल्या .........................................या परीक्षेस बसले/बसलो आहे. मला त्या परीक्षेतील संपादित गुणांची पडताळणी /**उत्तरपत्रिका छायाप्रत** प्राप्त करुन घ्यावयाची आहे. मी गुणपडताळणी/उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्याबाबच्या महत्वाच्या अटी व सुचना याचे वाचन केले आहे. सदर अटी/ शर्ती मला मान्य आहेत. माझ्या परीक्षेसंदर्भातील सर्व तपशील खाली देत आहे. कृपया गुणांची पडताळणी / उत्तरपत्रिका छायाप्रत करुन मिळावी. ही विनंती.

१. **विद्यार्थ्याचे नांव :-** ..........................................................................
२. परीक्षा केंद्राचे नांव :- ..................................................................... परीक्षा केंद्र नं. [ ][ ][ ][ ]
३. **परीक्षा विषयाचे नाव :-** ........................................................... **विषय कोड नं.** [ ][ ]
४. **परीक्षेचा बैठक क्रमांक :-** [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
५. **प्राप्त गुण :-**

| विभाग १ | विभाग २ | एकूण |
|---|---|---|
| | | |

६. **चलन/डी.डी. पाठविण्याचे कारण : गुणपडताळणी /उत्तरपत्रिका छायाप्रत**
७. **चलन/डिमांड ड्राफ्ट क्रमांक :-**
८. **रक्कम रुपये :-**
९. **दिनांक :-**

* **सहपत्रे :** १) ऑनलाईन गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत.
२) अर्जदाराचा पत्ता लिहिलेला लिफाफा.

गुण पडताळणी / उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर उत्तर पाठविण्यासाठी विद्यार्थ्यांचा पूर्ण पत्ता/ सही दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक :

---------------------------------------------------
---------------------------------------------------

वरील तपशील रेकॉर्डवरुन तपासला आहे व तो बरोबर खात्री करुन घेतली आहे.

* संस्था क्रमांक [ ][ ][ ][ ][ ]

सही
प्राचार्य
.......................................................वाणिज्य संस्था

दिनांक:

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे -१

## उत्तरपत्रिकची छायाप्रत मिळण्याबाबतच्या महत्वाच्या अटी/ शर्ती व सूचना

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहित पध्दतीने टंकलेखन संस्थेमार्फत अर्ज करणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसापर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात अर्ज करता येईल. अर्ज टपालाने विहित मुदतीच्या अंतिम दिनांका पूर्वी/पर्यंत पोहोचतील या बेताने पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३) विहित अर्जातील माहीती पूर्णपणे भरलेली असावी. अपुर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रतिविषय रु. ४००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

५) उत्तरपत्रिका छायाप्रती मागणी बाबतचा अर्ज व शुल्क ( परिषदेच्या चलनाव्दारे अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाव्दारे) पोस्टाने स्विकारण्यात येईल. अर्जासोबत विद्यार्थ्याच्या संकेतस्थळावरील गुणांची गुणपत्रिकेची छायाप्रत जोडावी.

६) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी रु. ४००/- इतके शुल्क चलनाने/डी.डी.ने भरुन अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) अर्जदारास छायाप्रत मिळण्याचा संभाव्य कालावधी त्याला भ्रमणध्वनी व्दारे कळविण्यात येईल.

८) उत्तरपत्रिकेची छायाप्रतची मागणी पोस्टाव्दारे असल्यास पोस्टाचा पुर्ण पत्ता जवळच्या खुणेसह देणे आवश्यक आहे. मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

९) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र/ फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

११) मा. सर्वोच्च न्यायालयाने परितोष भूपेशकुमार शेठ AIR १९८४/SC१५४३ च्या प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशानुसार तसेच तरदूदीनुसार विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन किंवा उत्तरपत्रिकांची पुन्हा तपासणी करण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्यास तसा हक्क असणार नाही.

१२) एकदा उत्तरपत्रिकेची छायाप्रत दिल्यावर त्याच्याशी संबंधित कोणतीही माहिती, माहिती अधिकाराखाली दिली जाणार नाही.

१३) परीक्षक/ नियामक इ. ची माहिती, माहीती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१४) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१५) उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१६) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१७)मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येणार नाही. तसेच शुल्क ही परत मिळणार नाही.

## गुणपडताळणीबाबत अटी/शर्ती व सूचना :

१) गुणपडताळणीसाठी प्रती विषय रु.१००/- शुल्क आकारण्यात येईल.
२) ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसापर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात अर्ज करता येईल. अर्ज टपालाने विहित मुदतीच्या अंतिम दिनांकापुर्वी/पर्यंत पोहोचतील या बेताने पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
३) गुणपडताळणीसाठी एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.
४) गुणपडताळणी अर्ज अपुर्ण भरलेला असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.
५) गुणपडताळणी नंतर पुनर्मूल्यांकनाची तरदूत नाही.
६) गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्याची गुणपडताळणी करुन दिली जाणार नाही.
७) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी केली जाणार नाही तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

टिप : सदर सुचना प्रसिध्दिसाठी टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांच्या नजरेस येईल अशा पध्दतीने दर्शनी नोटीस बोर्डावर लावावी.